# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**दुरध्वनी क्र.2333536-40**
**मुख्य प्रशासकीय इमारत, टाऊन हॉल,**
**छत्रपती संभाजीनगर-431001 (महाराष्ट्र राज्य)**


जा.क्र.मनपा/आस्था-1/2026/187. दिनांक - 16/02/2026.

**- : : जाहिरात : :-**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील सरळसेवेने खालील रिक्त पदे भरण्याबाबत प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | 7व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | | भरावयाची एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनस्तर | वेतनश्रेणी | |
| 1 | अभियांत्रिकी सेवा (गट-क) | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | एस-14 | 38600-122800 | 32 |
| 2 | अग्निशमन सेवा (गट-क) | उपअग्निशमन केंद्र अधिकारी | एस-10 | 29200-92300 | 04 |
| 3 | सुरक्षा सेवा (गट-क) | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | एस-10 | 29200-92300 | 01 |
| 4 | तांत्रिक सेवा (गट-क) | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निरीक्षक | एस-10 | 29200-92300 | 24 |
| 5 | सार्वजनिक आरोग्य सेवा (गट-क) | स्वच्छता निरीक्षक | एस-10 | 29200-92300 | 12 |
| 6 | पशुवैद्यकीय सेवा (गट-क) | पशुधन पर्यवेक्षक | एस-8 | 25500-81100 | 07 |
| 7 | अग्निशमन सेवा (गट-क) | चालक-यंत्रचालक (Driver Operator) | एस-8 | 25500-81100 | 15 |
| 8 | सार्वजनिक आरोग्य सेवा (गट-क) | उद्यान सहाय्यक/ कृषि सहाय्यक | एस-7 | 21700-69100 | 06 |
| 9 | तांत्रिक सेवा (गट-क) | अनुरेखक (ट्रेसर) | एस-7 | 21700-69100 | 09 |
| 10 | अग्निशमन सेवा (गट-क) | अग्निशामक | एस-6 | 19900-63200 | 100 |
| 11 | लेखा/लेखा परीक्षण सेवा (गट-क) | रोखपाल | एस-6 | 19900-63200 | 12 |

Rojgar Marathi.com

## ऑनलाईन अर्जाचे व परीक्षेचे वेळापत्रक

| अक्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचा कालावधी | 17/02/2026 ते 18/03/2026 |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | 18/03/2026 |
| 3 | ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या 07 दिवस आधी |
| 4 | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |
| 5 | ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत समस्या उद्भवल्यास ईमेल व हेल्पलाईन क्रमांक | http://cgrs.ibps.in<br>Helpline Number 1800222366/ 18001034566. |

- परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल. संभाव्य बदलाबाबत महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर माहिती प्रसारित केली जाईल.

- परीक्षा शुल्क

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| **खुला** | **अनाथ व मागास प्रवर्ग** |
| **रु.1,000/-** | **रु.900/-** |

1. माजी सैनिक व दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी शुल्क माफ राहील.
2. फक्त ऑनलाईन पध्दतीनेच परीक्षा शुल्क भरावयाचे आहे.
3. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.
4. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non- Refundable) आहे. ऑनलाईन शुल्क भरतांना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतःभरावे लागतील. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.
5. ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत इत्यादी बाबतचा तपशिल व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा वयोमर्यादा शिथिलता, निवड पध्दत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशिल www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

RojgarMarathi.com

# रिक्त पदांचा तपशील

**1) पदाचे नांव व गट -     कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)    (गट-क)**
**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे)    (एस-14)    38600-122800**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशै माप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 3 | 3 | 1 | 0 | 2 | 0 | 1 | 9 | 3 | 2 | 8 | 32 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 1 | 1 | 2 | 10 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 2 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 2 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | 01 पद | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 2 | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 4 | 2 | 1 | 4 | 18 |
| **एकूण** | **3** | **3** | **1** | **0** | **2** | **0** | **1** | **9** | **3** | **2** | **8** | **32** |
| **पदाची अर्हता व पात्रता** | | | | | | | | | | | | |
| अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | | | | | | | | | | | | |

**2) पदाचे नांव व गट -    उपअग्निशमन केंद्र अधिकारी    (गट-क)**
**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे)    (एस-10)    29200-92300**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशै माप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 4 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 4 |
| **एकूण** | **1** | **0** | **1** | 0 | 0 | 0 | 0 | **1** | **0** | **0** | **1** | **4** |

RojgarMarathi.com

**पदाची अर्हता व पात्रता**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.

ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा अकादमी , महाराष्ट्र शासन यांचा 1 वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा किंवा The Institution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडून Grade - I ही पदवी प्राप्त केलेली असावी किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील पदवी (B.E. Fire) धारण केलेली असावी किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील पदविका) धारण केलेली असावी किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Institution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेले असावे.

क) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अग्निशमन प्रणेता (Leading Fireman) / चालक - यंत्रचालक (Driver Operator) किंवा समकक्ष पदाचा किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक.

ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

इ) शारीरिक पात्रता :

1) उंची 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची 157 सें.मी.)

2) छाती- साधारण 81 सें.मी. फुगवून 86 सें.मी. जास्त महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

3) वजन 50 कि.ग्रॅ. (महिला उमेदवारांसाठी किमान 46 कि.ग्रॅ.)

4) दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी -6 / 6 तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली).

फ) वयोमर्यादा : उमेदवाराचे वय 40 वर्षांपेक्षा जास्त असू नये. (शासन नियमानुसार जोखीमभत्ता व युनिफॉर्म अपकीप)

**3) पदाचे नांव व गट - सहाय्यक सुरक्षा अधिकारी (गट-क)**

**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-10) 29200-92300**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्र | आदुध | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **एकूण** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** |

RojgarMarathi.com

| पदाची अर्हता व पात्रता |
|---|
| अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) लष्कर,निमलष्करी दलातील समकक्ष पद अथवा पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक अथवा समकक्ष पदावरील किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) शारीरिक पात्रता :<br>1) उंची किमान 165 सें.मी.,(महिला उमेदवारांची उंची किमान 157 सें.मी.)<br>2) छाती 81 सें.मी. फुगवून 86 सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>3) वजन किमान 50 कि.ग्रॅ. (महिला उमेदवारांसाठी किमान 46 कि.ग्रॅ.)<br>4) दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी -6/6 तसेच IShihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली.)<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

**4) पदाचे नांव व गट - स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निरीक्षक (गट-क) वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-10) 29200-92300**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 2 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 4 | 2 | 2 | 10 | 24 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 3 | 7 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 2 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | 01 पद | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 3 | 12 |
| **एकूण** | **2** | **1** | **0** | **0** | **1** | **1** | **1** | **4** | **2** | **2** | **10** | **24** |
| **पदाची अर्हता व पात्रता** | | | | | | | | | | | | |
| अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदविका किंवा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | | | | | | | | | | | | |

Rojgar Marathi.com

**5) पदाचे नांव व गट - स्वच्छता निरीक्षक (गट-क)**

**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-10) 29200-92300**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशै माप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 3 | 2 | 1 | 3 | 12 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 3 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 2 | 9 |
| **एकूण** | **0** | **1** | **0** | **1** | **1** | **0** | **0** | **3** | **2** | **1** | **3** | **12** |
| **पदाची अर्हता व पात्रता** | | | | | | | | | | | | |
| अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | | | | | | | | | | | | |

**6) पदाचे नांव व गट - पशुधन पर्यवेक्षक (गट-क)**

**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-8) 25500-81100**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशै माप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 3 | 7 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 6 |
| **एकूण** | **0** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** | **1** | **3** | **7** |

RojgarMarathi.com

**पदाची अर्हता व पात्रता**

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.
ब) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशुसंवर्धनाची पदविका उत्तीर्ण.
क) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामाचा किमान 2 वर्षांचा अनुभव आवश्यक.
ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

### 7) पदाचे नांव व गट - चालक-यंत्रचालक (ड्रायव्हर ऑपरेटर) (गट-क)
### वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-8) 25500-81100

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 4 | 15 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 2 | 9 |
| **एकूण** | **2** | **1** | **0** | **1** | **0** | **0** | **0** | **3** | **2** | **2** | **4** | **15** |

**पदाची अर्हता व पात्रता**

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.
ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र / महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम / प्रगत पाठ्यक्रम (Advanced Course) पूर्ण.
क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.
ड) जड वाहन चालक म्हणून 3 वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.
इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.
फ) शारीरिक पात्रता :
1) उंची 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची 157 सें.मी.)
2) छाती साधारण 81 सें. मी. फुगवून 86 सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)
3) वजन 50 कि.ग्रॅ. (महिला उमेदवारांचे वजन किमान 46 कि.ग्रॅ.)
4) दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी -6/6 तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली)
(ग) वयोमर्यादा :
उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा जास्त असू नये. (शासन नियमानुसार जोखीमभत्ता व युनिफॉर्म अपकीप)

Rojgar Marathi.com

## 8) पदाचे नांव व गट - उद्यान सहाय्यक (गट-क)

**वेतनश्रेणी (7 व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-7) 21700-69100**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 6 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 6 |
| **एकूण** | **0** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** | **1** | **1** | **6** |

**पदाची अर्हता व पात्रता**

अ) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स) ॲग्रीकल्चर/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी / मान्यताप्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी.

ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कृषी उद्यान क्षेत्रातील उद्यान निरीक्षक अथवा समकक्ष पदावरील किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक.

क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

## 9) पदाचे नांव व गट - अनुरेखक (गट-क)

**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-7) 21700-69100**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 | 2 | 1 | 9 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 3 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 6 |
| **एकूण** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** | **2** | **2** | **1** | **9** |

RojgarMarathi.com

| पदाची अर्हता व पात्रता |
|---|
| अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक/आरेखक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

**10) पदाचे नांव व गट – अग्निशामक (गट-क)**
**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-6) 19900-63200**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशै माप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 14 | 7 | 2 | 3 | 3 | 2 | 2 | 20 | 10 | 10 | 27 | 100 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 3 | 3 | 8 | 31 |
| माजी सैनिक (15%) | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 1 | 4 | 12 |
| अंशकालीन (10%) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | 9 |
| खेळाडू (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 5 | 3 | 1 | 2 | 2 | 1 | 1 | 7 | 3 | 3 | 9 | 37 |
| **एकूण** | **14** | **7** | **2** | **3** | **3** | **2** | **2** | **20** | **10** | **10** | **27** | **100** |

| पदाची अर्हता व पात्रता |
|---|
| अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र / महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम / प्रगत पाठ्यक्रम (Advanced Course) पूर्ण.<br>क) माजी सैनिकांना त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या 12 दिवस ते 30 दिवसाच्या प्रशिक्षण प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना नियुक्ती देण्यास पात्र ठरवून त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात 6 महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात यावे व समाधानकारक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच त्यांना नियुक्ती देण्यात यावी.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>इ) शारीरिक पात्रता :<br>1) उंची 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची 157 सें.मी.).<br>2) छाती साधारण 81 सें.मी. फुगवून 86 सें. मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.).<br>3) वजन 50 कि.ग्रॅ. (महिला उमेदवारांचे वजन किमान 46 कि.ग्रॅ.).<br>4) दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी -6 /6 तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली).<br>फ) वयोमर्यादा : उमेदवाराचे वय 30 वर्षांपेक्षा जास्त असू नये. (शासन नियमानुसार जोखीमभत्ता व युनिफॉर्म अपकीप) |

Rojgar Marathi.com

## 11) पदाचे नांव व गट – रोखपाल (गट-क)

**वेतनश्रेणी (7व्या वेतन आयोगाप्रमाणे) (एस-6) 19900-63200**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | 12 |
| **समांतर आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 3 |
| माजी सैनिक (15%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंशकालीन (10%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ (1%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| दिव्यांग (4%) | **निरंक** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 9 |
| **एकूण** | **2** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **2** | **1** | **1** | **3** | **12** |

**पदाची अर्हता व पात्रता**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी.
ब) मराठी टंकलेखनाचे किमान 30 शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टंकलेखनाचे किमान 40 शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र | धारण केलेले असावे.
क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

### 1. सर्वसाधारण सूचना :-

| | |
|---|---|
| 1. | वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणांमध्ये वाढ, घट अथवा बदल होण्याची शक्यता आहे. |
| 2. | उपरोक्त नमूद संवर्गातील पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवारांनी स्वतः खात्री करावायची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत. |
| 3. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी (Mobile No.) असणे आवश्यक आहे. भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर माहिती वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे. |
| 4. | अराखीव (खुला) पदांकरीता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| 5. | संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता ग्राह्य धरली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |

Rojgar Marathi.com

| | |
|---|---|
| 6. | अर्जातील माहिती/तपशील तसेच अर्जासोबत अर्हते / पृष्ठतेसंलग्न उमेदवारांने योग्य कागदपत्रे सादर केली आहेत यास अधिन राहून संबंधित उमेदवारास परीक्षेस बसण्यासाठी विचाराधीन करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारास सदर परीक्षेअंती किमान गुण प्राप्त झाले तरी परीक्षा संबंधित पदाची आवश्यक शैक्षणिक व इतर अर्हते संलग्नच्या कागदपत्राच्या पडताळणीअंती संबंधित उमेदवार शिफारस/निवडीस पात्र होईल. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी व अर्ज करावा. |
| 7. | नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्या संबंधित अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्या संबंधिचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे. |
| 8. | पत्रव्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्येच लिहावा, व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शन केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये. |
| 9. | अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल. आवश्यकतेनुसार मूळ शैक्षणिक / इतर कागदपत्रांची संबंधित शैक्षणिक विद्यापीठ / संस्था यांच्याकडे तपासणी करण्यात येईल. तसेच उमेदवार अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. |
| 10. | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता व ज्या दिव्यांग उमेदवारास लेखनिक घ्यावयाचा आहे इत्यादीबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| 11. | ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/दिव्यांग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे. अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. |
| 12. | प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता /अनुभव धारण करणे आवश्यक आहे. |
| 13. | अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी पूर्ण केलेली असावी, तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-2004/प्र.क्र.10/04/12, दिनांक 03 जुले 2004 अन्वये अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना अल्प कालावधीची किंवा तासिका तत्वावर, अतिरिक्त कार्यभार, प्रशिक्षण अभ्यागत किंवा अंशदानात्मक अशा स्वरुपाचे काम केलेल्या उमेदवारांना जर ते काम पूर्ण वेळ केलेले नसेल तर तो अनुभव नियुक्तीसाठी असल्याचे गृहीत धरणे योग्य होणार नाही, त्यामुळे या प्रश्नाचा सर्वकष विचार करुन शासन आदेशानुसार सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवाराच्या अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना रोजंदारी, कार्यव्ययी, करारपध्दतीवर, मानधन इत्यादी स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी नियुक्तीसाठी विहित केलेल्या अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल, |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| | मात्र तासिका (On Hour Basis), नियतकालीक (Periodical), अंशकालीन (Part Time). विद्यावेतन (On Stipend). अभ्यागत (Visiting), अंशदानात्मक (Contributory), विनावेतन (Without Pay) तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी, तसेच प्रभारी (Incharge) म्हणून नेमणुकीचा कालावधी,अतिरिक्त कार्यभाराचा (Additional Charge) कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही. |
| 14. | प्राप्त अर्जाच्या संख्येचा विचार करुन निवड प्रक्रियेचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार महापालिका आयुक्त व निवड समिती यांना राहिल. |
| 15. | नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतः करणे आवश्यक आहे. |
| 16. | अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) या अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा नावाच्या/पत्त्याच्या दोन भागांमध्ये एक स्पेसने (जागा) सोडावी. |
| 17. | एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावी. |
| 18. | उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, अर्हतेमध्ये नमूद केलेले विहित शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्रे, मराठी व इंग्रजी भाषेचे विहित गतीचे टंकलेखनाचे प्रमाणपत्र व संगणक ज्ञानाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र तसेच मागासवर्ग उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती, तसेच उमेदवाराची समांतर आरक्षणांतर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक असेल. |
| 19. | संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / सूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| 20. | पंधरा वर्ष सैनिकी सेवा झालेले माजी सैनिक यांची शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- आरटीए-1082/2327/सीआर-63/16-अ, दिनांक 05 ऑक्टोंबर 1989 नूसार असेल. |
| 21. | सदरची परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. |

RojgarMarathi.com

## 2. वयोमर्यादा –
### विविध संवर्गातील पदांसाठी किमान व कमाल वयोमर्यादा

| वयो मर्यादा गणनेचा दिनांक | कमाल वय | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान अराखीव (खुला)/ मागास वर्गीय/ आदुघ | अराखीव (खुला) | मागास वर्गीय/ अनाथ/ आदुघ | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | दिव्यांग, भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्य सैनिक पाल्य (कमाल) | | माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | अंशकालीन उमेदवार (कमाल) |
| | | | | अराखीव (खुला) | मागास वर्गीय/ अनाथ/ आदुघ | अराखीव (खुला) | मागास वर्गीय/ अनाथ/ आदुघ | अराखीव (खुला) | मागास वर्गीय/ अनाथ/ आदुघ | |
| 31/01/ 2026 | 18 | 38 | 43 | 43 | 43 | 45 | 45 | सैनिक सेवेचा कालावधी अधिक 3 वर्षे कमाल वयोमर्यादा 45 वर्षे | | 55 |

1. मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, अनाथ आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.
2. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सेवाप्रवेश नियम 2021 मधील 5.4 – वयोमर्यादेनुसार :- महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट 18 वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाचे प्रचलित नियम व त्याअनुषंगाने वेळोवेळी काढण्यात आलेले शासन निर्णयात नमूद केल्यानुसार असेल. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांसाठी कमाल 50 वर्षे व अराखीव कर्मचा-यांसाठी 45 वर्षे कमाल वयोमर्यादा लागू असेल.

| | |
|---|---|
| 2.1 | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन क्र.एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/कार्या 12, दि.25/04/2016 नुसार सद्यस्थितीत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 38 वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 43 वर्षे इतकी आहे. |
| 2.2 | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-1098/ प्र.क्र.39/98/16-अ. दि.16/06/2001 मधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींना उच्चतम वयोमर्यादा सरसकट 45 वर्षे इतकी राहील. |
| 2.3 | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडोल शुध्दीपत्रक क्र.मासैक-1010/प्र.क्र.279/ 10/16-अ, दि.20/08/2010 प्रमाणे दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलतीच्या अनुषंगाने वयाची कमाल मर्यादा 45 वर्षे इतकी राहील. |
| 2.4 | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शुध्दीपत्रक क्र.मासैक-1010/प्र.क्र.271/ 10/16-अ. दि.20/08/2010 अन्वये माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील. |
| 2.5 | सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.विकाक 2215//प्र.क्र.337/16-अ, दि.04/11/2016 नूसार प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहोल. |
| 2.6 | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अशंका-1918/प्र.क्र.507/16-अ. दि.02/01/2019 नुसार पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेत करावयांच्या नियुक्तीसाठी निश्चित करण्यात आलेली 46 वर्षे ही वयोमर्यादा 55 वर्षे इतकी शिथिल करण्यात आलेली आहे. |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| 2.7 | शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2002/379/ प्र.क्र.22/02/12, दि.01 नोव्हेंबर 2003 मधील तरतुदीनुसार ज्या पदांसाठी काही वर्षांचा अनुभव आवश्यक आहे, अशा पदांकरीता सेवा प्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा + संबंधित पदास विहित केलेल्या अनुभवाचा कालावधी इतपत किंवा पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी 50 वर्षे मर्यादपर्यंत व खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी 45 वर्षे मर्यादेपर्यंत अशी वयोमर्यादा फक्त शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता विहित करण्यात येत आहे. |
| 2.8 | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. निवक-1010/प्र.क्र.08/2010/ 16अ, दि.06/10/2010 अन्वये स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्यांसाठीचे वय 45 वर्षे इतके राहील. |
| 2.9 | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ-2018/ प्र.क्र.182/का-03, दि.20 ऑगस्ट, 2019 अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |
| 2.10 | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक महिआ 2023/ प्र.क्र.123 / कार्या-2. दिनांक 4 मे 2023 अन्वये उन्नत व प्रगत गटात मोडणाऱ्या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव प्रवर्गातील उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत. |

### 3. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

| | |
|---|---|
| 3.1 | भरावयाच्या उपरोक्त संवर्ग पदांचे सामाजिक समांतर आरक्षण तसेच वर नमूद केलेली पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. |
| 3.2 | पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची माहिती बदल वेळोवेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| 3.3 | विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, दिव्यांग व अनाथ इत्यादीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार राहील. |
| 3.4 | शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांकः महिला 2022/प्र.क्र.123/कार्या-2, दिनांक 04 मे,2023 अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदाच्या निवडीसाठी, अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. |
| 3.5 | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील. |
| 3.6 | महिलांसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअर मध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. |
| 3.7 | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (व), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| 3.8 | समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-1012/प्र.क्र.16/12/16-अ. दिनांक 13 ऑगस्ट, 2014 तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-1118/प्र.क्र.39/16-अ. दिनांक 19 डिसेंबर, 2018 आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| 3.9 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-4011/प्र.क्र.31/16-अ. दिनांक 12 फेब्रुवारी,2019 व दिनांक 31 मे,2021 आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील दावा केलेल्या उमेदवारांनी सन 2025-2026 या आर्थिक वर्षांचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| 3.10 | शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण-2023/प्र.क्र.76/मावक, दिनांक 9 मार्च,2023 अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन 2025-2026 या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. |
| 3.11 | अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले, तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| 3.12 | सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयीसवलतीचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्राचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्या प्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल. |
| 3.13 | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती, (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |

## 4. दिव्यांग आरक्षण :-

| | |
|---|---|
| 4.1 | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16 अ. दिनांक 29 मे, 2019 तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. |

Rojgar Marathi.com

4.2 प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या विविध संवर्ग / पदाकरिता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | शारिरीक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग | जबाबदारी व कर्तव्ये |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S, ST, W, BN, MF, RW, SE, H, C | a) LV<br>b) D, HH<br>c) OA,BA,OL,BL,Dw,AAV<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above | महानगरपालिकेतील स्थापत्य विषयीची कामे करणे, कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण, कामांचा दर्जा तपासणे, महानगरपालिकेच्या कार्य नियमावलीनुसार कामे करणे. |
| स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/ अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निरीक्षक | S, ST, W, BN, MF, RW, SE, H, C | a) LV<br>b) D, HH<br>c) OA,BA,OL,BL,Dw,AAV<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above | महानगरपालिकेतील स्थापत्य विषयीची कामे करणे, कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण, कामांचा दर्जा तपासणे, महानगरपालिकेच्या कार्य नियमावलीनुसार कामे करणे. |

**Functional Requirement Abbreviations Used :-** S=Sitting, ST=Standing, W=Walking, BN=Bending, MF=Manipulation with Fingers, RW=Reading & Writing, SE=Seeing, H=Hearing, C=Communication.

**Category Abbreviations Used :-** B=Blind, LV=Low Vision, D=Deaf, HH=Hard of Hearing, OA=One Arm, BA=Both Arms, OL=One Leg, BL=Both Leg, OAL=One Arm and One Leg, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, MDy=Muscular Dystrophy, ASD=Autism Spectrum Disorder (M=Mild, MoD=Moderate), SLD=Specific Learning Disability, ID=Intellectual Disability, MI=Mental Illness, MD=Multiple Disabilities.

4.3 दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

4.4 दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

4.5 दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे एकूण भरावयाच्या पदसंख्येच्या 4% असतील.

Rojgar Marathi.com

| | |
|---|---|
| 4.6 | संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान 40% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रधारक उमेदवार/व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलतीसाठी पात्र असतील. |
| 4.7 | लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार/व्यक्ती खालील सवलतीच्या दाव्यास पात्र असतील :-<br>(1) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती लागू राहतील.<br>(2) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या सोयी सवलती लागू राहतील, |
| 4.8 | लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि 2018/ प्र.क्र.46/आरोग्य-6, दिनांक 14 सप्टेंबर, 2018 मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. |
| 4.9 | शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांकः दिव्यांग-2024/प्र.क्र.86, दि.क.2, दिनांक 27 जून,2024 अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.14 सप्टेंबर, 2018 च्या शासन निर्णयान्वये/भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या/येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांच्याकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील. |
| 4.10 | लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार/उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही. |
| 4.11 | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए 1082/3502/सीआर-100/26-अ, दि.02 सप्टेंबर 1983 अन्वये,<br>अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात आणि युध्द नसतांना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक 15% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्यक्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.<br>आ) युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा दिव्यांगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य असलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने 15% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. |

## 5. खेळाडू आरक्षण -

| | |
|---|---|
| 5.1 | शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 1 जुलै, 2016, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-2002/ प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 18 ऑगस्ट, 2016. तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः संकीर्ण-1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2. दिनांक 30 जून, 2022 शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः खेआक्ष-2725/प्र.क्र.33/क्रीयुसे-02, दिनांक 15 मे, 2025 आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भांत तसेच त्यांचे वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| 5.2 | प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत तसेच उमेदवार कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता पात्र ठरतो याविषयी संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रमाणपत्र प्रदान केलेला विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे अनिवार्य आहे. |
| 5.3 | खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही. |
| 5.4 | कागदपत्रे पडताळणीवेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्याचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारसी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल. |
| 5.5 | एकापेक्षा जास्त खेळांची प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. |

## 6. अनाथ आरक्षण -

| | |
|---|---|
| 6.1 | अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अनाव 2022/ प्र.क्र.122/का-03, दिनांक 6 एप्रिल 2023, दिनांक 10 मे 2023 तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील. तसेच विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार एखाद्या भरती प्रकियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाही तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथाच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारातून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| 6.2 | अनाथ व्यक्तीसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल. |
| 6.3 | प्रस्तुत पदासाठी अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक 06 सप्टेंबर,2022, दिनांक 06 एप्रिल, 2023 आणि दिनांक 10 मे, 2023 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. |
| 6.4 | अनाथ व्यक्तीसाठी असलेली पदे एकूण भरावयाच्या पदसंख्येच्या 1% असतील. |
| 6.5 | महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ 2018/ प्र.क्र. 182/ का-03. दि.20 ऑगस्ट, 2019 अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |

Rojgar Marathi.com

## 7. निवड पध्दत :-

| | |
|---|---|
| 7.1 | जाहिरातीमध्ये नमूद पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. |
| 7.2 | नोंदणी प्रक्रियेनंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. एकदा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेद्वारे लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवाराला ई-मेल व मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे त्याबाबत सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरून त्याचे प्रवेशपत्र डाऊनलोड करु शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| 7.3 | परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेणेत येईल. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा लघुसंदेशाद्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| 7.4 | जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोयीस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/ अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. |
| 7.5 | **उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 50% व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.** |
| 7.6 | सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची /उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| 7.7 | उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबर ज्या पदासाठी अर्ज केलेला असेल, त्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. |
| 7.8 | पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीसाठी पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या ई-मेल अथवा मोबाईलवर लघुसंदेशादारे कळविण्यात येईल. |
| 7.9 | निवडसूचीतील उमेदवाराची व त्या उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणीसाठी (Verification) उमेदवाराने मूळ (Original) कागदपत्रासह प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे. |

Rojgar Marathi.com

7.10 निवडसूची प्रवर्गनिहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या खालीलप्रमाणे राहील. –

| प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| 2 ते 4 | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या 100 टक्के किंवा 5 यापैकी जे अधिक असेल ते. |
| 5 ते 9 | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या 50 टक्के किंवा 10 यापैकी जे अधिक असेल ते. |
| 10 ते 49 | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या 30 टक्के किंवा 15 यापैकी जे अधिक असेल ते. |
| 50 किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या 25 टक्के. |

वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात येईल.

7.11 पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल आयडीवर/भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे निवडसूची/प्रतिक्षा यादी व नियुक्तीबाबत कळविण्यात येईल. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

7.12 निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षासाठी विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची आपोआप व्यपगत होईल.

7.13 कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त दाखला, भूकंपग्रस्त दाखला, दिव्यांग प्रमाणपत्र, खेळांडूचे प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, अंशकालीन उमेदवार प्रमाणपत्र, अनाथ असल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. बाबतची मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

7.14 कागदपत्रे तपासणीअंती निवड यादी व प्रतिक्षायादी छत्रपती संभाजीनगर महानरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

7.15 विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे तपासणीच्या वेळी अर्जासोबत जोडलेल्या दस्तऐवजांच्या मूळ प्रती व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेल्या ओळखीचा पुरावा व स्वतःचे आधार कार्ड / निवडणूक आयोगाचे ओळखपत्र / पासपोर्ट / पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वसाक्षांकित प्रत (Self Attested) सोबत आणणे अनिवार्य आहे.

7.16 शासन निर्णय प्रतिमं 1222/प्र.क्र.54/का.13.-अ दि.04/05/2022 अन्वये गट-क व गट-ड च्या पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही.

RojgarMarathi.com

## 8. समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी –

| | |
|---|---|
| 8.1 | अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| 8.2 | ब) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त करीत असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| 8.3 | क) वरील अनु.क्र.(8.1) व (8.2) या दोन्ही अटीमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत,अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवी, पदवी, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण,माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| 8.4 | वरोल अनु.क्र.(8.2) व (8.3) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चस्तर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| 8.5 | वरील निकष लागूनही उमेदवारांची गुणानुक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या इंग्रजीमधील आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल. |
| 8.6 | सेवा प्रवेश नियम / जाहिरात / अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल. |
| टीप - | आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.एससीवाय १२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३/०१/२००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय. |

## 9. अर्ज, अर्हता इत्यादी :-

| | |
|---|---|
| 9.1 | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरलेल्या अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, तसेच अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांक व वेळेनंतर अर्ज करण्याची कार्यप्रणाली बंद होईल. अन्य प्रकारे अर्ज करू नयेत. |
| 9.2 | महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेला अंतिम दिनांक इ. तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत आयुक्त,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. |

## 10. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :

| | |
|---|---|
| 10.1 | उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.chhsambhajinagarmc.org या वेबसाईटवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. |
| 10.2 | उमदेवारास अर्ज सादर करताना काही समस्या उद्भवल्यास http://cgrs.ibps.in/ या लिंकवर अथवा 1800222366 / 18001034566 या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. |

RojgarMarathi.com

<table>
<tr><td>10.3</td><td>ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक<br>उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने अर्ज व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कालावधी उपलब्ध असेल.<br><br><table><tr><th>अ.क्र.</th><th>तपशील</th><th>दिनांक व वेळ</th></tr><tr><td>1</td><td>ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी लिंक सुरु होण्याचा दिनांक व वेळ</td><td>दि.17/02/2026</td></tr><tr><td>2</td><td>ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ</td><td>दि.18/03/2026</td></tr></table><ul><li>ऑनलाईन अर्जासोवत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही, ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतः भरावे लागतील, ऑनलाईन परीक्षेच्यावेळी सदर ई-पावतीची छायांकीत प्रत प्रवेशासोबत सादर करणे आवश्यक आहे.</li><li>परीक्षा शुल्क ना परतावा (Non Refundable) आहे.</li><li>कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.</li></ul></td></tr>
<tr><td>10.4</td><td>अर्जात हेतुपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षात गैरवर्तन करणे, परीक्षेच्या वेळी नक्कल (Copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ठ किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार महापालिका आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी / शर्ती पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.</td></tr>
<tr><td>10.5</td><td>वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (SSC) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.</td></tr>
<tr><td>10.6</td><td>शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.</td></tr>
<tr><td>10.7</td><td>गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी,</td></tr>
<tr><td>10.8</td><td>ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.<br>1. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे,<br>2. अर्ज सादरीकरण,<br>3. शुल्क भरणा.</td></tr>
</table>

RojgarMarathi.com

**10.9 प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**


1. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर वापरकर्त्यांची प्रोफाईल करण्याकरीता नवीन वापरकर्त्यांची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल, नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.
2. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्यामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.
4. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःचा Login व Password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

**5. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-**

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ से.मी. x ४.५ से.मी.) स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :-

1. एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा, फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा. स्टेंपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.
2. फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजचे आहे.

फोटो रुंदी 3.5 से.मी.



फोटो उंची 4.5 से.मी.

3. छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.
4. विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास तो ग्राह्य धरली जाणार नाही.
5. वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी, संपूर्ण पृष्ठे अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.
6. स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्यावेळी प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

Rojgar Marathi.com

10.10 **अर्ज नोंदणी**

1. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्याwww.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन Apply Online या पर्यायावर क्लिक करा, त्यानंतर एक नवीन स्क्रिन उघडेल.
2. अर्ज नोंदणी करण्यासाठी “नवीन नोंदणीसाठी” येथे क्लिक टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ईमेल आयडी प्रविष्ठ करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रिनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि लघुसंदेश देखील पाठविला जाईल.
3. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरु शकत नसेल, तर तो सेव्ह आणि नेक्स्ट टॅब निवडून आधीच एंटर केलेला डेटा जतन करु शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी सेव्ह आणि नेक्स्ट सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करुन घ्यावी.
4. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण “पूर्ण नोंदणी” बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही/करणे शक्य होणार नाही.
5. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे/तिचे वडील/पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे जसे ते प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते,
6. तुमचे तपशील सत्यापित करा आणि जतन करा आणि पुढील बटणावर क्लिक करुन तुमचा अर्ज जतन करा.
7. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वामध्ये दिलेल्या वैशिष्ट्यानुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.
8. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी पूर्वावलोकन टॅबवर क्लिक करा.
9. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्रे, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच “नोंदणी पूर्ण” वर क्लिक करा.
10. पेमेंट टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे.

10.11 **परीक्षा शुल्क भरणे:-**

- ऑनलाईन मोड –

1. डेबिट कार्ड (Rupay/Visa/Master Card/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्डर्स / मोबाईल वॉलेट वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.
2. व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर एक ई-पावती तयार होईल.
3. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.
4. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंट आऊट घेणे आवश्यक आहे.

10.12 **स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.**

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा / तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

Rojgar Marathi.com

| | |
|---|---|
| | • **छायाचित्र प्रतिमा: (३.५cm x ४.५em)**<br>1. छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.<br>2. हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीच्या विरुध्द घेतलेले असावे.<br>3. टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.<br>4. परिमाण २०० x २३० पिक्सेल (प्राधान्य)<br>5. फाईलचा आकार २०KB-५०KB दरम्यान असावा.<br>6. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५० KB पेक्षा जास्त नसावा.<br>7. ऑनलाईन अर्ज भरतांना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील,<br>8. संबंधित लिंकवर क्लिक करा. छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा.<br>9. तुमचा फोटो,स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>10. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>11. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहीजे की छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर ते योग्य आकाराचे व सुस्पष्ट दिसले पाहीजेत तसेच ते योग्यरित्या अपलोड झालेले आहेत. |
| 10.13 | **स्वाक्षरी**<br>• अर्जदाराने काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी.<br>• परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्य).<br>• फाईलचा आकार १० KB-२०KB दरम्यान असावा स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २० KB पेक्षा जास्त नाही याची खात्री करा. |
| 10.14 | **कागदपत्रे स्कॅन करणे**<br>• स्कॅनर रेझोल्यूशन किमान 200 dpi वर सेट करा.<br>• रंग true colour सेट करा. |
| 10.15 | **कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया:-**<br>1. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.<br>2. संबंधित लिंकवर क्लिक करा छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा.<br>3. तुमचा फोटो,स्वाक्षरी,अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>4. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>5. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.<br>6. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे,<br>**टिप**:-ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घ्यावी. |
| 10.16 | **अर्ज सादरीकरण –**<br>१. सदर अर्ज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर दिनांक 17/02/2026 पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.<br>२. उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने अदा करावे, |

Rojgar Marathi.com

| | |
|---|---|
| 10.17 | **परीक्षा शुल्क –**<br>१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु.१,०००/-<br>2. अनाथ व मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु.900/-<br>३. परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणा करण्यात यावे.<br>४. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.<br>5. परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे. |
| 10.18 | वरील कार्यपध्दती हो अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील. |
| 10.19 | उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इ.माहिती काळजीपूर्वक भरावी. सदर माहिती चुकल्यास त्यास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. |
| 10.20 | उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रकावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी. |
| 10.21 | उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील तपशिल व ऑनलाईन पध्दतीने सादर केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या आधारे परीक्षेस बसणेस मुभा देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार संभाव्य निवडसूची क्षेत्रात आला तरी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ संभाव्य निवडसूची क्षेत्रात आल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा. |
| 10.22 | भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| 10.23 | विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही. |
| 10.24 | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता इ. संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा नंतर विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| 10.25 | ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालय /समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड / दिव्यांग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन उमेदवार यांनी देखील स्वतंत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक राहील. |

RojgarMarathi.com

**11. परीक्षा -**

| | |
|---|---|
| 11.1 | • जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक पदासाठी ऑनलाईन परीक्षा वेगवेगळी घेण्यात येईल.<br>• परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित/बुध्दीमत्ता चाचणी व विषयज्ञान या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर परीक्षेचा दर्जा हा संबंधित पदाकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पूरक राहील.<br>• प्रत्येक संवर्गाचे परीक्षेचे गुण 200 व परीक्षेचा कालावधी दोन तास राहील. परंतु अग्निशमन सेवेतील उपअग्निशमन केंद्र अधिकारी, चालक यंत्रचालक व अग्निशामक या संवर्गाचे परीक्षेचे गुण 100 व परीक्षेचा कालावधी एक तास राहील. तसेच शारिरीक व मैदानी चाचणीकरीता 100 गुण असतील.<br>• ऑनलाईन परीक्षा ही त्या पदाची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप, तांत्रिक ज्ञान यांचेशी संबंधित राहील. |
| 11.2 | जाहिरातीमध्ये नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर परीक्षेच्या 7 (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र स्वतः संकेतस्थळावरून काढून घ्यावे.<br>• परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतःजवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेशपत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.<br>• परीक्षा केंद्राची शहरे उपलब्धतेनुसार निश्चित केली जातील. |
| 11.3 | दिव्यांग कल्याण आयुक्तालय यांचे दि.२० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२ दि.१८/०३/२०१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन,अल्पदृष्टी, सेरेब्रल, पल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी संदर्भात व्यवस्था करण्यास परवानगी घेता येईल,<br><br>**लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग व्यक्तीसाठी मार्गदर्शक तत्वेः-**<br>दृष्टीहीन उमेदवार आणि उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाईन परीक्षेदरम्यान त्याच्या स्वतःच्या लेखनिकाचा वापर खाली दिलेल्या मर्यादेच्या अधीन राहून करू शकतात.<br>• उमेदवारास त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल व लेखनिकाकडून परीक्षा नियमांचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी घ्यावी लागेल.<br>• उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमाचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काळजीपूर्वक सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्विकारली जाणार नाही.<br>• एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसऱ्या उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करता येणार नाही. |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| | • लेखनिक कोणत्याही शैक्षणिक प्रवाहातील असू शकतो. तथापि विशेष तज्ञ अधिकाऱ्यांच्या पदांसाठी लेखनिक हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील नसावा. तसेच सदर मदतनीसाची शैक्षणिक पात्रता ही उमेदवाराच्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कमीत कमी, एक स्तर कमी असावी,<br>• उमेदवार आणि लेखनिक या दोघानांही उचित हमीपत्र दयावे लागेल की लेखनिकाने वर नमूद केलेल्या लेखनिकांसाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत, तर अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>• जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्ल्यानुसार 20 मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.<br>• लेखनिकाने स्वतःहून उत्तर देऊ नये,असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल,<br>• फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल, जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणाऱ्या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतीना परवानगी दिली जाणार नाही.<br>• परीक्षेदरम्यान,कोणत्याही टप्प्यावर,लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास,संबंधित उमेदवारांचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल व उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर परीक्षा पर्यवेक्षकांनी परीक्षेनंतर लेखनिकाने प्रश्नाची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल सादर केल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>• लोकोमोटर डिसॅबिलिटी आणि सेरेब्रल पाल्सी (Locomotor Disability and Cerebral Palsy) असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर डिसॅबिलिटी आणि सेरेब्रल पाल्सीबाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादिपर्यंत (किमान 40% दिव्यांग) असेल अश्या उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे सवलतीची वेळ अनुज्ञेय असेल,<br>• दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे.<br>• दृष्टिहीन उमेदवार चाचणीसाठी सामग्री बधित (मॅग्निफाइंड) फॉन्टमध्ये पाहण्याची निवड करू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी 20 मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील.<br>जे उमेदवार परीक्षेसाठी लेखनिकाची सेवा वापरतात, परीक्षेतील मजकूर आवर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टिहीन उमेदवारांना लागू राहील. ही मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे/ स्पष्टीकरण, जर काही असतील, त्यानुसार बदलू शकतात. |
| 11.4 | ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुरविण्यात आली आहे. अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला 20 मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी दिव्यांगत्याचे प्रमाण किमान 40% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकीत प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. |
| 11.5 | परीक्षेनंतर आवश्यकतेनुसार संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना 1:3 या प्रमाणात कागदपत्रे /प्रमाणपत्रे पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल. |
| 11.6 | काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.chhsambhajinagarmc.org संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| 11.7 | **ओळख पटवणे -**<br>परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card)/पारपत्र (Passport)/वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड, बँक पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / शासकीय कर्मचारी ओळखपत्र / विद्यापीठ / कॉलेजचे फोटोसहीत ओळखपत्र/बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्यांना परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमेदवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br>**टीप -** उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो असलेले ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.**<br>• **निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारावर करण्यात येणारी कार्यवाही :-**<br>उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| 11.8 | परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने,<br>१. अनुचित प्रकार करणे किंवा<br>२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,<br>३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रानिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,<br>४. स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा,<br>५. स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा,<br>६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,<br>७. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी/पर्यवेक्षक/समावेशक यांच्याशी अरेरावी करणे, उद्धटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे. अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल. |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| | ८. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे पुढील कालावधीत घेण्यात येणा-या कोणत्याही परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.<br>९. जर उमेदवार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रूजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल. |

## 12. परीक्षा केंद्राविषयी नियमावली :-

| | |
|---|---|
| 12.1 | १. प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.<br>२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादीबाबत बदल करण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.<br>३. महापालिकेस परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील.<br>४. महापालिकेस उमेदवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल.<br>५. उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही.<br>६. एखाद्या परीक्षा केंद्रावर पुरेसे उमेदवार ऑनलाईन परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमेदवार झाल्यास महापालिकेस उमेदवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल.<br>7. परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र (Calculator), आयपॅड तत्सम इलेक्ट्रानिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने सोबत बाळगणेस आणि वापरण्यास सक्त मनाई असेल. |

## 13. परीक्षेला उशिरा येण्याबाबत :-

| | |
|---|---|
| 13.1 | परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी २ तास (१२० मिनिटे) असली तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पूर्ण करण्यासाठी जसे की सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, इत्यादी, बाबींच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या किमान १ तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही. |

## 14. कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे -

सदर परीक्षेच्या निकालानंतर संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|
| 1. अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र |
| 2. शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे |

RojgarMarathi.com

| |
|---|
| 3. वयाचा पुरावा.<br>4. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा.<br>5. राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र (अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य)<br>6. वैध नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र,<br>7. पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा.<br>8. पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा.<br>9. खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा,<br>10. अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा.<br>11. अराखीव महिला,मागासवर्गीय,आदुघ,खेळाडू,दिव्यांग,माजी सैनिक,अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र.<br>12. विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा.<br>13. मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा.<br>14. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र.<br>15. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्र (डोमिसाईल).<br>16. पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबातचे प्रमाणपत्र (शासन निर्णय क्र.पअंक-१००९/ प्र.क्र.२००/ २००९/१६-अ. दि.२७/१०/२००९ नुसार).<br>१७. शासन निर्णय मानंस २०१२/प्र.क्र.२७७/३९. दि.०४/०२/२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र<br>१८. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र<br>१९. भूकंपग्रस्त प्रमाणपत्र<br>२०. पात्रतेसंदर्भातील विविध दाव्याच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे इत्यादी |

**15. इतर सर्वसाधारण अटी/शती/सूचना:-**

| | |
|---|---|
| 15.1 | उमेदवार हा भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात 15 वर्षे अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे कार्यालयाकडील) उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा 1950 च्या कलम 20 अनुसार जो अर्थ आहे. तोच अर्थ असेल, |
| 15.2 | जातीच्या दाव्याच्या पृष्ठयर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम,2000 मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| 15.3 | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणा-या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| 15.4 | परीक्षेचे प्रवेशपत्र, वेळापत्रक, बैठक व्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवाराची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त निवडसूची, अंतिम निवड व इतर सर्व सूचना या वेळोवेळी www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत |

Rojgar Marathi.com

| | |
|---|---|
| | उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. |
| 15.5 | उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील, त्याकरीता उमेदवाराने नियमित छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील. |
| 15.6 | शासनाकडील किंवा खाजगी कंपनीकडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फोजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. |
| 15.7 | निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर, उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |
| 15.8 | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवाराने विहित केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इ. विशिष्ट स्वरूपात भरून दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रुजू करून घेतले जाणार नाही. |
| 15.9 | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| 15.10 | निवड झाल्यास उमेदवारास रू.५००/- च्या मुद्रांक पेपरवर नोटरी समोर आवेदनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत व सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र नियुक्तीपूर्वी सादर करावे लागतील. |
| 15.11 | महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय उमेदवारांवर बंधनकारक असतील, |
| 15.12 | परीक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय राहणार नाही. |
| 15.13 | उमेदवारांनी अर्ज करण्याच्या दिनांकास सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे. |
| 15.14 | निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवा विनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू होतील. |
| 15.15 | शासन निर्णय माहिती तंत्रज्ञ (सा.प्र.वि.), क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ शासन पुरकपत्र दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व दिनांक १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| 15.16 | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकिर्ण/२००७/पडताळणी/नवि-२६, दि.२१/११/२००७ अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरूद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/ तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल. |

Rojgar Marathi.com

| | |
|---|---|
| 15.17 | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडोल आदेश क्र.एस.आर.व्हो.२०००/प्र.क्र.१७/ २०००/२०१२, दि.१/७/२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. |
| 15.18 | उपरोक्त पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. |
| 15.19 | उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यास मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. |
| 15.20 | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४. दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू राहील, |
| 15.21 | उपरोक्त पदाकरीता नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून एक/दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. तसेच अशा उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षाधीन कालावधी ६ महिने वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचारी/अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| 15.22 | अग्निशमन सेवेतील सर्व पदांकरीता ऑनलाईन परीक्षेकरीता १०० गुण व मैदानी क्षमता चाचणी परीक्षेकरीता १०० गुण अशी एकूण २०० गुणांची परीक्षा असेल. इतर सर्व पदांकरीता २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा असेल, |
| 15.23 | अग्निशमन सेवेतील पदाकरीता अर्जात नमूद करण्यात आलेली शारिरीक पात्रता मैदानी चाचणीच्या वेळी तपासण्यात येईल. पदास आवश्यक असलेली किमान पात्रता प्राप्त न केल्यास उमेदवाराची उमेदवारी/निवड रद्द करण्यात येईल. |

## १६. इतर

| | |
|---|---|
| 16.1 | परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. मात्र पुन्हा चाचणीसाठी उमेदवारांचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही. समस्या निराकरण करण्याच्या प्रक्रियेत जाण्यास इच्छूक नसलेले किंवा सहभागी होण्यास इच्छूक नसलेले उमेदवार प्रक्रियेतून नाकारले जातील. |
| 16.2 | भरतीशी संबंधीत सर्व बाबीमध्ये महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारावर बंधनकारक असेल, यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेव्दारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही. |
| 16.3 | परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात घेतल्यास, सत्रामध्ये वापरल्या जाणा-या वेगवेगळया चाचणीच्या काठीण्य पातळीतील किंचित फरक समायोजित करण्यासाठी विविध संचामधील गुणांकन समतुल्य केले जातील. केंद्राची क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्र आवश्यकतेनुसार घेण्यात येतील. |
| 16.4 | Groupwise Time Setter बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयामधील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करून त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करून त्याप्रमाणे परीक्षेमध्ये "ग्रुप लेवल टायमरची" अंमलबजावणी करण्यात येईल. |
| 16.5 | महापालिका वैयक्तिक उमेदवारांनी नोंदविलेल्या उत्तरांचे विश्लेषण इतर उमेदवारांच्या बरोबर आणि चुकीच्या उत्तरांच्या मधील समानता शोधण्यासाठी करेल. या संदर्भात महापालिकेद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत उत्तरे सामायिक केली गेली आहेत आणि मिळालेले गुण वैध नाहीत असा |

RojgarMarathi.com

| | |
|---|---|
| | निष्कर्ष काढला गेला असेल, तर महापालिका संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत असून अशा अपात्र उमेदवारांचे निकाल रोखले जातील. |
| 16.6 | निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि / किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला भविष्यात महापालिकेच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळून आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल. |
| 16.7 | जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक किंवा तदनुषंगिक अर्हता अर्ज सादर करतेवेळी उमेदवाराने धारण करणे अनिवार्य आहे. |

**१७. विशेष सूचना :**

| | |
|---|---|
| १७.१ | महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेख ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील. |
| १७.२ | जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल. |
| १७.३ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती/ मध्यस्थ ठगयांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत. |
| 17.4 | यापूर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरून पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 17.5 | परीक्षेची वेळ, दिनांक, ठिकाण, परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) याबाबत वेळोवेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका संकेतस्थळावर कळविण्यात येईल, याबाबतची दक्षता स्वतः उमेदवाराने घेणे आवश्यक आहे. |
| 17.6 | प्राप्त अर्जाची संख्या लक्षात घेता परीक्षेची वेळ, दिनांक व ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत अर्जदारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| 17.7 | उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार त्यांचेकडे राखून ठेवले आहेत. |

RojgarMarathi.com

दिनांक : 16/02/2026.

**(जी.श्रीकांत)**
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

## गट-अ व गट-ब – सरळसेवा भरती
## उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात लिहावयाचे घोषणापत्र

मी --------------------------------------------------- राहणार -----------------------------

---------------------------------------------------------- यापदासाठी अर्ज करीत असून मी सदरच्या अर्जात भरलेली माहिती पूर्णपणे सत्य आहे. अर्जातील माहिती किंवा अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे चुकीची आढळून आल्यास मी दंडनीय कारवाईस पात्र राहील,याची मला कल्पना आहे.

करिता मी घोषणापत्र लिहून देत आहे.

दिनांक - / /2026.

सही ---------------------------

नांव --------------------------

-

Rojgar Marathi.com